# महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH

Govt. Dental College & Hospital Building, St. George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel. No. +91-22-22620361-65/22652257/59 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax: +91-22-22620562/22652168 Website: http://www.dmer.org

क्र.संवैशिवसं/एमएच-एसएसईटी/पात्रता/२०१३/निकष/२-अ, दिनांक : २ डिसेंबर, २०११

# बंधपत्रीत उमेदवारांसाठी अधिसूचना

## वैद्यकीय अतिविशेषोपचार सामाईक प्रवेश परीक्षा (एमएच-एसएसईटी) करिताच्या पात्रतेबाबत

**संदर्भ : शासन पत्र क्र.एमईडी-१०११/प्र.क्र.१८२/११/शिक्षण-२, दिनांक १७ ऑक्टोबर, २०११.**

राज्य शासनाच्या प्रचलित वैद्यकीय अतिविशेषोपचार अभ्यासक्रम प्रवेशासाठी सामाईक परीक्षेकरिताच्या (एमएच-एसएसईटी) नियमांच्या अनुषंगाने एम.डी./एम.एस. पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेले उमेदवार हे एक व एकापेक्षा जास्त प्रयत्नांसाठी एमएच-एसएसईटीच्या परीक्षेसाठी बसतात. त्या अनुषंगाने एमएच-एसएसईटी या वैद्यकीय अतिविशेषोपचार सामाईक प्रवेश परीक्षेकरिता उमेदवारांनी किती वेळा बसावे याकरिता निर्बंध नाही याचा फायदा घेवून असंख्य उमेदवार वैद्यकीय अतिविशेषोपचार सामाईक परीक्षा पूर्वतयारी करण्याची कारणे दाखवून बंधपत्रीत सेवा करण्याचे टाळतात असे दिसून आलेले आहे. त्या अनुषंगाने एमएच-एसएसईटी-२०१३ च्या पात्रतेच्या नियमांमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत. एमएच-एसएसईटी-२०१२ च्या पात्रतेच्या नियमामध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.

### -: बंधपत्रीत उमेदवारांसाठी एमएच-एसएसईटी-२०१३ पासून सुधारीत पात्रतेबाबतचे नियम :-

(१) एमएच-एसएसईटी-२०१३ या सामाईक प्रवेश परीक्षेस एम.डी./एम.एस. पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झाल्यानंतरच्या दिनांकापासून सलग फक्त दोन प्रयत्नांसाठी बंधपत्रीत विद्यार्थ्यांना बसण्याची मुभा असेल.

(२) एम.डी./एम.एस. पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकानंतर दोन प्रयत्न झाल्यानंतर अभ्यासक्रमास प्रवेश न मिळालेल्या किंवा न घेतलेल्या उमेदवाराने एक वर्षाची बंधपत्रीत सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याला पुन्हा एमएच-एसएसईटी परीक्षेला पुढील प्रयत्नांसाठी बसण्यास पात्र समजण्यात येणार नाही.

(३) एमएच-एसएसईटी-२०१३ ही सामाईक परीक्षा साधारणपणे मे, २०१३ मध्ये घेण्याचे प्रायोजित आहे. एमएच-एसएसईटी-२०१२ च्या परीक्षेस दुसऱ्या प्रयत्नासाठी बसणाऱ्या उमेदवारांना एक वर्षाची बंधपत्रीत सेवा केल्याशिवाय एमएच-एसएसईटी-२०१३ च्या परीक्षेस तिसऱ्या प्रयत्नासाठी बसण्यास अपात्र समजण्यात येईल.

(४) एमएच-एसएसईटी-२०१२ च्या परीक्षेस तिसऱ्या किंवा जास्तीच्या प्रयत्नांसाठी बसणारा उमेदवार हा अयशस्वी झाल्यास एमएच-एसएसईटी-२०१३ च्या परीक्षेस एक वर्षाची बंधपत्रीत सेवा केल्याशिवाय बसण्यास अपात्र समजण्यात येईल.

(५) एमएच-एसएसईटी च्या २ प्रयत्नानंतर एक वर्षाची बंधपत्रीत सेवा पूर्ण केल्यास त्या पुढील सर्व वर्षांच्या एमएच-एसएसईटीच्या परीक्षेस बसण्यास सध्या प्रयत्नांची मर्यादा नाही.

(६) एमएच-एसएसईटी ही परीक्षा राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाने (भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने) घेतली तरी सुध्दा पात्रतेबाबतचे वरील नियम हे सर्व बंधपत्रीत उमेदवाराना बंधनकारक होतील.

(७) एमएच-एसएसईटी परीक्षेस बसण्यासाठी प्रयत्नांची मोजणी करताना एम.डी./एम.एस. पदव्युत्तर पदवी परीक्षेनंतर किंवा उत्तीर्ण झालेल्या दिनांकानंतर घेण्यात आलेल्या फक्त दोन परीक्षांना बसण्याची मुभा आहे. यामध्ये सदर परीक्षेस उमेदवार प्रत्यक्ष बसला होता किंवा नाही याचा विचार केला जाणार नाही.

(८) <u>भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या संकेतस्थळावर नुकत्याच प्रसिध्द् केलेल्या अधिसूचनेप्रमाणे वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व जागांसाठी भारतात एकच सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याचे प्रस्तावित आहे.</u> सदरची परीक्षा प्रस्तावित केल्याप्रमाणे घेण्यात आल्यास राज्यातील शासकीय/महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालयातील राज्य शासनाच्या कोटयातील जागा भरताना वरील नियमांचे पालन करण्यात येईल.

(९) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शेवटच्याच शैक्षणिक सत्रात असतानाच किंवा निकालापूर्वी उमेदवार अतिविशेषोपचार अभ्यासक्रमाच्या समाईक प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरतो. कोणत्याही परिस्थितीत ईच्छुक उमेदवाराने त्या शैक्षणिक वर्षातील एमएच-एसएसईटी ही सामाईक प्रवेश परीक्षा दिली नाही तरी त्याचा एक प्रयत्न झाला असे गणले जाईल.

(१०) महाराष्ट्राबाहेरुन पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना एमएच-एसएसईटी सामाईक प्रवेश परीक्षेला बसण्याकरिता प्रयत्नांची मर्यादा रहाणार नाही. तसेच उपरोक्त नियम त्यांच्याकरिता लागू नाहीत. मात्र अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बंधपत्रीत सेवेबाबतचा नियम लागू राहील.

(११) पदव्युत्तर पदवी (एम.डी./एम.एस.) अर्हता प्राप्त झाल्यानंतर एमएच-एसएसईटी परीक्षेच्या प्रथम किंवा द्वितीय प्रयत्नापूर्वी एक वर्षाची बंधपत्रीत सेवा पूर्ण केलेला उमेदवार एमएच-एसएसईटी परीक्षेसाठी पुन्हा बसण्यास प्रयत्नांची मर्यादा असणार नाही.

(१२) उमेदवाराने पीजीएम-सीईटी सामाईक प्रवेश परीक्षेकरिता तिसऱ्या प्रयत्नाच्या आधी एक वर्षाची बंधपत्रीत सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे. एखादया उमेदवारास बंधपत्रीत सेवा करावयाची नसेल, अशा उमेदवाराने नियमाप्रमाणे बंधपत्र दंडाची रक्कम भरणा केल्यानंतर त्याला तिसऱ्या व पुढील प्रयत्नांसाठी पात्र ठरविण्यात येईल.

(१३) पदव्युत्तर पदवी (एम.डी./एम.एस.) अर्हता प्राप्त झाल्यानंतर उमेदवाराने, शासनाने विहीत केलेली बंधपत्रीत दंडाची रक्कम भरणा केल्यास सदरच्या उमेदवारास पीजीएम-सीईटी परीक्षेसाठी बसण्यास प्रयत्नांची मर्यादा असणार नाही.

(१४) या संबंधी कोणतेही आक्षेप, हरकती किंवा सूचना संचालनालयास ही अधिसूचना प्रसिध्द् झाल्यापासून १५ दिवसांच्या आत कळविण्यात यावेत. १५ दिवसांनंतर प्राप्त होणारे आक्षेप अथवा सूचनांचा विचार केला जाणार नाही. याबाबत संचालनालयाने घेतलेला निर्णय अंतिम राहील व तो निर्णय संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. सदरचे आक्षेप ई-मेलद्वारे (feedbackdmer@gmail.com) पाठवावेत.

(१५) सदरची अधिसूचनेची अंमलबजावणी ही मा.उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक १४४०/२०११, १८३४/२०११ आणि १८३५/२०११ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येईल.

उपरोक्त पात्रता निकषांच्या अनुषंगाने योग्य ती नोंद सर्व ईच्छुक उमेदवार, वैद्यकीय महाविद्यालये व पदव्युत्तर संस्था यांनी घ्यावी, ही विनंती.

**सही/-**
**संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**